**सी.एन.आर.क्र. एम.एच.एस.आय ०९–०००१४४–२०१५**

**नियमित दिवाणी दावा क्र. ३१/२०१५**

**निशाणी क्र.५८ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत दावा वादींनी प्रतिवादी विरुध्द निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत कामातील वादी क्र.३ शोभा दिगंबर रुमडे ही दि.२९/०५/२०२३ रोजी मयत झाली असून तिचे वारस दाव्यातील वादी क्र.१ व २ हे आहेत. वादींचे मुखत्यार यांच्या पायाची दोन ऑपरेशन झाल्यामुळे त्यांना वादी क्र.३ चे नाव दाव्यातून कमी करणेची तजवीज करता आली नाही. तरी दाव्यातील वादी क्र.३ हिचे नावावर काट मारण्याची व त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याची विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी नि.क्र.५९ येथे म्हणणे दिले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने केलेला अर्ज खोटा व खोडसाळ असून अर्जासाठी दिलेले कारण धादांत खोटे आहे. वादीने मुद्दामहून दाव्याचे कामी उशीर व विलंब करणेसाठी सदर अर्ज गेले वर्षभर मे. न्यायालयासमोर करणे टाळले आहे. तरी वादीचा अर्ज खर्चासहीत फेटाळण्याची विनंती केली आहे.

०४. अर्जाचे अवलोकन केले. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा हा वादी यांनी निरंतर ताकीदी करिता दाखल केला आहे.

०५. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. सदर कामी नि.क्र.५७ येथील मयत वादी क्र.३ शोभा दिगंबर रुमडे यांच्या मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले. सदर अर्जावरुन दाव्यातील वादी क्र.३ या मयत असल्याचे दिसून

येते. वादी यांच्या कथनानुसार प्रस्तुत दाव्यातील वादी क्र.१ व २ हे मयत वादी क्र.३ हिचे वारस आहेत. त्यामुळे मयत वादी क्र.३ हिचे अन्य वारस नसल्याने कोणालाही अभिलेखावर घेण्याची आवश्यकता नाही. वादी मागणी करतात त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती केल्यास दाव्याचे स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. याउलट, दावा मिळकती मधील वादीच्या व प्रतिवादींच्या हक्काबाबत निराकारण करणे सोईचे होणारे आहे. सदर अर्जामध्ये तथ्य असून सदरची दुरुस्ती ही न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचे निराकरण होण्यासाठी वादी यांनी अर्जात दिल्या प्रमाणे दुरुस्ती करणेस हरकत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

– **आदेश** –

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादी क्र.३ यांचे नाव कमी करुन १४ दिवसांच्या दाव्यात दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी. सदर आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश रद्दबातल समजणेत येईल.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.07.03 17:22:01 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः०३/०७/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड